**ठळक बातम्या**

- डिजिटल सुरक्षेसाठी थांबा, विचार करा नंतरच मग कृती करा असं प्रधानमंत्री प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आकाशवाणीवरच्या मन की बात मधून आवाहन

- विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्ष, काँग्रेस तसंच राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारांची तिसरी यादी जाहीर

- जागतिक उद्योगविश्व भारतात गुंतवणुकीसाठी उत्सुक असल्याचं परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांचं प्रतिपादन

**आणि**

- मुंबईत वांद्रे टर्मिनसवर झालेल्या चेंगराचेंगरीत ९ जण जखमी, राज्यातल्या मोठ्या स्थानकांवर आजपासून प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीवर निर्बंध

**<><><><><>**

डिजिटल सुरक्षेसाठी थांबा, विचार करा, आणि मग कृती करा या तीन पायऱ्यांचा अवलंब करावा, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना केलं आहे. त्यांनी आज आकाशवाणीवरून मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा एकशे पंधरावा भाग होता.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी उदाहरणादाखल डिजीटल अटकेशी संबंधित फसवणूकीच्या फोन कॉलचं ध्वनीमुद्रण श्रोत्यांना ऐकवलं, फसवणूक करणाऱ्यांची कार्यपद्धती आणि अशा वेळी आपण घाबरून न जायची खबरदारी याविषयी देखील त्यांनी श्रोत्यांना समजावलं. डिजीटल अटक अशी कुठलीही तरतूद कायद्यात नाही,

तर ही फसवणूक आहे, अशा प्रकारची फसवणूक करणारे समाजाचे शत्रू आहेत, असं ते म्हणाले. या सगळ्याचा प्रतिकार करण्यासाठी अनेक तपास यंत्रणा आणि राज्य सरकारं परस्पर सहकार्यानं काम करत असून, त्यांच्यातल्या समन्वयासाठी राष्ट्रीय सायबर समन्वय केंद्राची स्थापना केली असल्याची माहिती त्यांनी दिली. अशा घटनांविरोधात नागरिकांनी १९३० या राष्ट्रीय सायबर मदत क्रमांकावर अथवा सायबर क्राइम डॉट जीओव्ही डॉट इन या पोर्टलवर कळवावं अशी माहितीही त्यांनी दिली.

**होल्ड - प्रधानमंत्री तीन पायऱ्या**

देशातलं गेमिंग अवकाशही झपाट्यानं विस्तारत असून भारत एक नवी क्रांती घडवण्याच्या मार्गावर असल्याचं ते म्हणाले. ॲनिमेशन क्षेत्रामुळे भारतीयांची सर्वाधिक निर्मिती असलेल्या व्ही आर अर्थात आभासी पर्यटनालाही मोठी चालना मिळाली असल्याचं त्यांनी सांगितलं. उद्या २८ ऑक्टोबरला जागतिक ॲनिमेशन दिवस साजरा होणार असून, यानिमित्तानं देशाला जागतिक ॲनिमेशन ऊर्जा केंद्र बनवण्याचा संकल्प करायचं आवाहनही त्यांनी केलं. आत्मनिर्भर भारताविषयी बोलताना प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड - आत्मनिर्भर**

देशभरात शारीरिक तंदुरुस्तीविषयी वाढत चाललेल्या जाणिवेच्या उर्जेचा आपल्याला अनुभव येत असल्याचं ते म्हणाले.

भारताच्या कला आणि संस्कृतीबद्दल जगभरात असलेल्या आकर्षणाचाही उल्लेख प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बात मध्ये केला.

**<><><><><>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस तसंच काँग्रेस पक्षानं आपापल्या उमेदवारांच्या तिसऱ्या याद्या जाहीर केल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं कारंजा इथून ज्ञायक पटनी, हिंगणघाटमधून अतुल वांदिले, अणुशक्तीनगर इथून फहाद अहमद, हिंगणा इथून रमेश बंग, चिंचवडमधून राहुल कलाटे आणि परळी विधानसभा मतदारसंघातून राजेसाहेब देशमुख यांना उमेदवारी जाहीर केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसनं गेवराई विधानसभा मतदारसंघातून विजयसिंह पंडित, फलटणमधून सचिन पाटील, निफाडमधून दिलीप बनकर आणि पारनेरमधून काशिनाथ दाते यांना उमेदवारी जाहीर केली आहे. काँग्रेसच्या यादीत १६ नावांचा समावेश आहे. यात दिग्रस मतदारसंघातून माणिकराव ठाकरे यांना, तर अंधेरी पश्चिममधून सचिन सावंत यांना काँग्रेसनं निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे. कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातून राजेश लाटकर आणि सांगलीतून पृथ्विराज लाटकर काँग्रेसकडून निवडणूक लढवणार आहेत.

**<><><><><>**

जागतिक उद्योगक्षेत्राबरोबरच, जागतिक नेत्यांचाही भारताविषयीचा विश्वास वाढला आहे. जागतिक उद्योगविश्व भारतात गुंतवणुकीसाठी उत्सुक आहे. सुसज्ज सुविधांसोबतच महाराष्ट्र हे भौगोलिकदृष्ट्या गुंतवणुकीसाठी सर्वाधिक योग्य राज्य असल्याची जागतिक उद्योगांची भावना आहे. त्यामुळे विकसित भारत संकल्पनेच्या पूर्ततेमध्ये महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. राज्य आणि केंद्र सरकार जिथे एकत्र काम करतात ती उद्योगांची सहाजिकच पहिली पसंती असते असं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी आज केलं. मुंबईत भाजपा कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मोदी सरकारच्या तिसऱ्या पर्वात

विकसित महाराष्ट्राच्या संकल्पपूर्तीसाठी समर्पितपणे वेगवान काम सुरू असून त्यासाठी महाराष्ट्राचा विकास वेगवान असायलाच हवा. स्वातंत्र्यानंतर उद्योग, तंत्रज्ञान, विमानतळ, रेल्वे वाहतूक, बुद्धिमत्ता, भौगोलिक सुविधा यांमध्ये महाराष्ट्र कायम आघाडीवर राहिला आहे. असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज रायगड जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

वार्ताहरांनी बातमीची निष्पक्षता आणि विश्वासार्हता टिकवून ठेवावी, असं आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं. आकाशवाणीच्या प्रादेशिक वृत्त विभागाच्या वतीने आयोजित  अंशकालीन वार्ताहरांची कार्यशाळेत मुंबईत ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून माहिती प्रसारण मंत्रालयाच्या पश्चिम विभागाच्या महासंचालक स्मिता वत्स शर्मा उपस्थित होत्या. राज्याचे अतिरीक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी, महाराष्ट्र सायबर पोलीस उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे यांनी यावेळी मार्गदर्शन केलं.

<><><><><>

मुंबईतील वांद्रे टर्मिनसवर आज  पहाटे अडीच च्या सुमाराला  प्रचंड गर्दी झाल्यानं चेंगराचेंगरी झाली.  यात ९ जण जखमी झाले असून दोघांची प्रकृती गंभीर आहे. वांद्रे टर्मिनस, इथल्या फलाट क्रमांक एक वर वांद्रे-गोरखपूर  या गाडीत

बसण्यासाठी मोठी गर्दी झाल्यामुळे ही चेंगराचेंगरी झाली. दिवाळीसाठी आपल्या गावी जाणाऱ्या मजुरांचा या गर्दीत समावेश होता.

**<><><><><>**

दिवाळीनिमित होणारी अतिरिक्त गर्दी टाळण्यासाठी रेल्वेच्या काही प्रमुख स्थानकांवरील प्लॅटफॉर्म तिकीट विक्री आजपासून येत्या ८ नोव्हेंबर पर्यंत बंद राहणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, लोकमान्य टिळक टर्मिनस, ठाणे, कल्याण, पुणे,  नागपूर या स्थानकांचा यात समावेश आहे.  ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींसोबत असणाऱ्यांना यातून सवलत मिळणार आहे.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यातल्या विक्रमगडमधल्या ‘विक्रमगड बांबू उद्योग प्रोड्यूसर कोऑपरेटिव्ह लिमिटेड’ या कंपनीच्या आदिवासी महिलांनी यंदा बांबूपासून पर्यावरणपूरक आकाशकंदील तयार करण्यावर भर दिला आहे. या महिलांनी आतापर्यंत ३ हजारांहून अधिक आकाशकंदील तयार केले आहेत.  आठ गावांतल्या जवळपास १३० महिला आणि २० पुरुष अशा १५० लोकांनी मिळून हे आकाशकंदील तयार केले आहेत.

या आकाशकंदीलांना भारतासह परदेशात ही मागणी आहे. यंदा कंपनीच्या महिलांनी जवळपास १८ लाखांचं उत्पन्न मिळवलं आहे. विक्रमगडमधील या महिलांचा बचतगटाच्या माध्यमातून सुरू झालेला प्रवास आता एका कंपनीत रूपांतरीत झाला आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये, भारत-न्यूझीलंड दरम्यान तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात न्यूझीलंडने भारताला २६० धावांचं लक्ष्य दिलं

आहे. प्रथम फलंदाजी करत न्यूझीलंडच्या संघाने निर्धारित षटकात नऊ बाद १५९ धावा केल्या. भारताकडून राधा यादवनं चार, दीप्ती शर्मानं दोन, तर सायमा ठाकोर आणि प्रिया मिश्रा यांनी प्रत्येकी एक खेळाडू बाद केला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या २१ षटकात ५ बाद ९० धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

नागपूर इथं आज सीमा शुल्क विभागाने मोठा मद्यसाठा जप्त केला. यात मद्याच्या ४४८ सिलबंद बाटल्या तसंच वाहन आणि मोबाईलसह एकूण ३८ लाख ६९ हजार रूपयांचा मुद्येमाल जप्त करत तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यातल्या नेर गावात राज्य उत्पादन शुल्क विभागाने बनावट देशी दारूच्या कारखान्यावर छापा टाकून २५ लाख २२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल काल जप्त केला. या प्रकरणातले तीन संशयित आरोपी फरार झाल्याची माहिती विभागानं दिली आहे.

**//<><><><><>//**